# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालला तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- १३ /२०२०**

**तक्रारकर्ता श्री. कादर करीम शेख**
डी-सेक्टर, जी लाईन, रुम नं. १५, चीता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८८.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (परि. २) एम/पूर्व,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एम/पूर्व विभाग, दुसरा मजला,
मधुकर तुकाराम कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०००४३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता एम/पूर्व,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एम/पूर्व विभाग, पहिला मजला,
मधुकर तुकाराम कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०००४३

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०२.२०२०**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

*आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र.४१७२/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १६२५/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०१.०१.२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-*

१) *"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.*
२) *सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र.१३/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ०३.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीचे वेळी तक्रारकर्ते उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीवर त्यांचा अहवाल १५ दिवसामध्ये आयोगासमोर सादर करावा व त्याची एक प्रत अपिलार्थी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालय यांनी त्यावर पुढील कार्यवाही करावी.

**मुंबई**
**दिनांक : ०३.०२.२०२०**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

ISSUED
Date 07 FEB 2020

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १३/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. कादर करीम शेख**

**सुनावणी दिनांक : १५.०५.२०२५ (In continuation of order dt ०३.०२.२०२०)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीवर त्यांचा अहवाल १५ दिवसामध्ये आयोगासमोर सादर करावा व त्याची एक प्रत अपिलार्थींना द्यावी. जन माहिती अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालय यांनी त्यावर पुढील कार्यवाही करावी असे आदेशित केले होते.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि- २) एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडून आयोगाच्या कार्यालयाने दि. ३०.०३.२०२२ रोजी अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि- २) एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. १६.०४.२०२२ आयोगास सादर केला त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे:-

*"अपिलकर्त्यांस दिलेले अभिलेख व त्याबाबतची धारिणी आढळून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे किंवा नाही याचा देखील बोध होत नाही. निम्नस्वाक्षरीकाराने प्रशासकीय अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या अभिलेखाचा कसून शोध घेतला असता माहिती अधिकार अर्ज, त्यास तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांने दिलेले उत्तर, प्रथम अपिल व त्यावरील आदेश हे अभिलेख आढळून आले आहेत, परंतु सदरच्या अभिलेखांमधून सदर प्रकरणात राज्य माहिती आयोगास उत्तर देण्यासाठी अर्जदारास उपलब्ध करून दिलेल्या माहितीचा बोध होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.*

तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली किंवा नाही यासाठी तक्रारकर्ता यांना सुनावणीस बोलविले होते. परंतु, तक्रारकर्ता सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

20-5-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २०.०५.२०२५**